राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत (Routed Through State Government) खेळत्या भांडवलासाठी श्री. दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि. बिद्री (मौनीनगर). ता. कागल, जि. कोल्हापूर या सहकारी साखर कारखान्यास मार्जिन मनी लोन मंजूर करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः बैठक ०६२५ /प्र.क्र.९९/३स**

रूम नं. ६२०, ६ वा मजला, विस्तार इमारत,मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,मुंबई-४०००३२
दिनांक : १६ मार्च, २०२६

**संदर्भ:-** १. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक:ससाका २०१९/प्र.क्र.८०/३स, दि. ०५.०९.२०१९.

२. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक:ससाका२०२३/प्र.क्र.२३/३स, दि. ०४.०५.२०२३.

३. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक:ससाका ०१२५/प्र.क्र.०२/३स, दि. ३०.०१.२०२५ व दि. १७.०९.२०२५.

४. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक:ससाका ०४२५/प्र.क्र.८९/३स, दि. २५.०६.२०२५.

५. मा. मंत्री मंडळ उपसमितीच्या दि.२७.०५.२०२५ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

६. राष्ट्रीय सहकार विकास निगम यांचे पत्र क्र: सं.रा.स.वि.नि.:२१-८/२०२३-Sugar/२५६७/SB५२३९१/३८८, दि. ०४.०२.२०२६

७. राष्ट्रीय सहकार विकास निगम यांचे पत्र क्र: NCDC: २१-८/२०२३-Sugar/४०३, दि.१६.०२.२०२६

**प्रस्तावना :-**

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्याकडून महाराष्ट्र शासनामार्फत (Routed Through State Government) खेळत्या भांडवलासाठी मार्जिन मनी लोन उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्तावांची तांत्रिक व आर्थिक छाननी करण्यासाठी साखर आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली आहे. त्यानुसार साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयात नमूद अटी व शर्तीनुसार त्यांच्या कार्यालयास प्राप्त प्रस्तावांची आर्थिक व तांत्रिक छाननी करुन शासनास सादर केला व तद्नंतर सदर प्रस्ताव संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये मा. मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या मा. मंत्रिमंडळ उपसमितीच्या दि.२०.०३.२०२५ व दि.२७.०५.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत ठेवण्यात आला. सदर बैठकींमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांना सदर साखर कारखान्याला मार्जिन मनी लोन उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले असता, त्यांनी संदर्भ क्र. ६ येथील पत्रान्वये श्री. दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि. बिद्री (मौनीनगर). ता. कागल, जि. कोल्हापूर या कारखान्यास काही अटींच्या अधीन राहून मार्जिन मनी लोन देण्यास मान्यता दर्शविली आहे व संदर्भ क्र. ७ येथील पत्रान्वये राष्ट्रीय सहकार विकास निगम यांनी सदर कारखान्यास मार्जिन मनी कर्जाचा

रु.२६१.८० कोटी इतका निधी उपलब्ध करु दिला आहे. त्यामुळे सदर उपलब्ध करुन दिलेला मार्जिन मनी कर्जाचा निधी श्री. दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि. बिद्री (मौनीनगर). ता. कागल, जि. कोल्हापूर या कारखान्यास वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांचेकडून महाराष्ट्र शासनामार्फत (Routed through State Government) खेळत्या भांडवलासाठी श्री. दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि. बिद्री (मौनीनगर). ता. कागल, जि. कोल्हापूर या कारखान्यास रु.२६१.८० कोटी (रुपये दोनशे एकसष्ठ कोटी ऐंशी लक्ष फक्त) इतक्या रकमेचे मार्जिन मनी लोन राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांनी मंजूर केले असून खालील नमूद प्रयोजनासाठी वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | बाब | (रुपये कोटीत) |
|---|---|---|
| १ | गाळप क्षमता विस्तारीकरण कर्ज - ( केडीसीसी बँक) | २४.४४ |
| २ | गाळप क्षमता विस्तारीकरण कर्ज - ( सांगली डीसीसी बँक) | २४.७५ |
| ३ | आत्मनिर्भर कर्ज - (केडीसीसी बँक) | १७.०० |
| ४ | गोडावूउन मध्यम मुदत कर्ज - ( केडीसीसी बँक) | ०.३४ |
| ५ | ६० KLPD इथेनॉल मध्यम मुदत कर्ज - ( केडीसीसी बँक) | २१.३२ |
| ६ | ६० KLPD इथेनॉल मध्यम मुदत कर्ज (सांगली डीसीसी बँक) | १३.९९ |
| ७ | मोलॅसिस टँक मध्यम मुदत कर्ज - ( केडीसीसी बँक) | ०.९२ |
| ८ | पॉवर हाऊस बांधकाम मध्यम मुदत कर्ज - ( केडीसीसी बँक) | ०.७८ |
| ९ | बगॅस यार्ड भिंत बांधकाम मध्यम मुदत कर्ज - ( केडीसीसी बँक) | ०.९५ |
| १० | मोलॅसिस टँक फॅब्रीकेशन मध्यम मुदत कर्ज - ( केडीसीसी बँक) | ०.८१ |
| ११ | एफ आर पी कर्ज - ( केडीसीसी बँक) | ७२.०० |
| १२ | वाढीव एफ आर पी कर्ज - ( केडीसीसी बँक) | ५६.५० |
| १३ | तोडणी वहातूक कर्ज - ( केडीसीसी बँक) | २८.०० |
| | **एकूण** | **२६१.८०** |

**२.** सदर मान्यता राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) यांच्या संदर्भ क्र.६ येथील पत्रात नमूद खालील अटी व शर्ती, तसेच शासनाच्या संदर्भ क्र.२ व ४ येथील अनुक्रमे दि.०४.०५.२०२३ व दिनांक २५.०६.२०२५ रोजीच्या शासन निर्णयात नमूद अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

१) राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) कर्ज मुद्दल परतफेडीचा कालावधी २ वर्षांच्या विलंबावधीसह ८ वर्षांचा असेल. तथापि, व्याज भरण्यावर कोणताही विलंबावधी लागु राहणार नाही.

२) मंजुरी रकमेचा प्रस्तावित वापर केडीसीसीबी लिमिटेड आणि सांगली डीसीसीबीच्या विद्यमान कर्जांच्या परतफेडीसाठी असल्याने, सर्व बँकांच्या सोसायटीच्या कर्जनिहाय येणेबाकी रकमेची

खातरजमा करुन घेतल्यानंतर सदर कारखान्यास कर्जाचा निधी वितरित करण्याची साखर आयुक्त कार्यालयाने दक्षता घ्यावी.

३) साखर कारखान्यास राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) मार्जिन मनी कर्जाची रक्कम प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत, कोल्हापूर मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित कोल्हापूर व सांगली मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित सांगली या बँकांकडून संबंधित कर्जाची कर्जबाकी निरंक झाल्याचे प्रमाणपत्रे (Loan Closure Certificates) सादर करणे आवश्यक राहील.

४) साखर कारखान्याच्या गाळप क्षमतेनुसार कार्यक्षेत्रामध्ये पुरेशा प्रमाणात ऊस उपलब्ध होईल याची कारखान्याकडून हमी घेण्यात यावी.

५) कर्जाच्या परतफेडीसाठी साखर व उप पदार्थाच्या विक्री उत्पन्नातून निर्धारीत दरानुसार टॅगिंग / एस्क्रो (Escrow) खात्यातून कर्ज वसुली करण्यात यावी.

६) कर्जासाठी हमी म्हणून तारणक्षम शिल्लक मालमत्तेचे प्रमाण कर्ज रकमेच्या किमान १.२५ पट इतके प्रमाण (Security Coverage) कर्ज परतफेड कालावधीत राखले जाईल याबाबतचे हमी पत्र कारखान्याने सादर करणे आवश्यक राहील.

७) कर्जावर कर्जाच्या प्रत्यक्ष वितरणाच्या वेळी किंवा एनसीडीसीने देऊ केलेल्या व्याजदराचा दर असेल. व्याज दर मासिक चक्रवाढ आधारावर आकारले जाईल आणि ते प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या दिवशी केले जाईल. तथापि, व्याजाचे पेमेंट आणि मुद्दलाची परतफेड दरवर्षी केली जाईल. सध्या मासिक चक्रवाढ आधारावर प्रभावी व्याजदर (फ्लोटिंग व्याजदर) ८.२५% आहे. देय तारखेला किंवा त्यापूर्वी हप्त्याची परतफेड केल्यास प्रभावी व्याजदर / देऊ केलेला व्याजदर लागू असेल. देय तारखेला किंवा त्यापूर्वी हप्त्याची परतफेड न केल्यास, प्रभावी / देऊ केलेल्या दरापेक्षा १% जास्त असलेला सामान्य व्याजदर लागू असेल. शिवाय, हप्त्यांची परतफेड करण्यात कसूर झाल्यास, 'मुद्दल रकमेच्या डिफॉल्ट हप्त्यांवर' आणि विलंब कालावधीसाठी 'सामान्य व्याज' वर सामान्य व्याजदरापेक्षा २.५% दराने दंडात्मक व्याज आकारले जाईल. कर्जाच्या पहिल्या हप्त्याच्या काढण्याच्या मानल्या जाणाऱ्या तारखेच्या पहिल्या वर्धापनदिनापासून व्याजदराची भरपाई सुरू होईल. इतर अटी आणि शर्ती NCDC च्या पत्र क्रमांक NCDC.१- १/८४-Budt दिनांक १५.१०.१९८४ आणि क्रमांक NCDC.१-१/९०-Budt दिनांक १५.०९.२०२५ द्वारे कळवल्याप्रमाणे आणि वेळोवेळी सुधारित केल्याप्रमाणे असतील.

८) कर्जाचा उचित विनियोग आणि कामकाजातील प्रगती सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र शासन तसेच प्रादेशिक संचालनालय, राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC), पुणे यांनी साखर कारखान्यास दर तिमाहीस भेट देऊन दक्षतापूर्वक आढावा घ्यावा.

९) महाराष्ट्र शासनाची पूर्वपरवानगी आणि राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) च्या शिफारसीशिवाय सहकारी साखर कारखान्यांनी कोणत्याही प्रकल्पाची उभारणी आणि स्थिर मालमत्तेत गुंतवणूक करू नये.

१०) सहकारी साखर कारखान्याच्या व्यवस्थापनात कोणताही बदल झाल्यास त्याची माहिती राज्य शासनास आणि राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) ला तात्काळ देण्यात यावी.

११) सहकारी साखर कारखानदारांनी सर्व संबंधित दोन किंवा त्यापेक्षा जास्त हितसंबंधित पक्षीय व्यवहार हे प्रचलित बाजार परिस्थिती लक्षात घेऊन करण्यात यावेत.

१२) सहकारी साखर कारखान्यांच्या संचालक मंडळावर एका सदस्याची नियुक्ती करण्याचा अधिकार राष्ट्रीय सहकार विकास निगमला (NCDC) असेल. अशा बैठकांना उपस्थित राहण्याचा खर्च संबंधित साखर कारखान्याने भागवणे आवश्यक आहे.

१३) सहकारी साखर कारखानदारांना सूचित करण्यात येते की, ते कर्जाची संपुर्णत: परतफेड होईपर्यंत त्यांच्या संचालक मंडळाला पगार, मानधन किंवा इतर कोणतेही भत्ते यांसारखे कोणतेही फायदे देऊ नयेत. तसेच अशा संचालकांनी धारण केलेल्या भागभांडवलावर लाभांश दिला जाणार नाही.

१४) संबंधित सहकारी साखर कारखान्यास जेथे कर्ज परतफेड पर्याप्तता प्रमाण (DSCR) एक पेक्षा कमी परिगणित करण्यात आलेला असेल तेथे संबंधित सहकारी साखर कारखान्याने रोख निधी उपलब्धतेमधील तूट त्वरित भरून काढणे आवश्यक असेल.

१५) राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) कर्जाच्या संपुर्णत: परतफेड होईपर्यंतच्या कालावधीत सहकारी साखर कारखान्याचे भागभांडवल अबाधित ठेवण्यात येईल. भाग भांडवलाची काही प्रमाणात परतफेड केली गेल्यास, संबंधित सहकारी साखर कारखान्यास त्याची भरपाई करण्याबाबत सूचित करण्यात येत आहे.

१६) संबंधित सहकारी साखर कारखान्यास असेही सूचित करण्यात येते की, राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) कर्जाची संपुर्णत: परतफेड होईपर्यंत यापुढील कालावधीत अंदाजित रोख निधी उपलब्धता लक्षात घेऊन कर्ज परतफेड पर्याप्तता प्रमाण (DSCR) कोणत्याही वेळी किमान एक पातळीवर राहील याची सुनिश्चिती करण्यासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करावा.

१७) सदर सहकारी साखर कारखान्यांकडून खालील प्रमाणे नमुद अतिरिक्त सुरक्षा तारण करुन घेण्यात यावे:

i) प्रस्तावित कर्जाच्या परतफेडीसाठी सहकारी साखर कारखान्यांच्या विक्री उत्पन्नाचे टॅगिंग/एस्क्रो खात्यातुन कर्ज वसुली करणे.

ii) प्रस्तावित कर्जाच्या परतफेडीसाठी महाराष्ट्र शासनाच्या नावे पोस्ट डेटेड चेक (PDC) घेणे.

iii) चेअरमन आणि सर्व संचालक मंडळ सदस्यांची वैयक्तिक हमी.

iv) प्रस्तावित कर्जाच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र शासनाच्या नावाने संपूर्ण मालमत्ता तारण सर्वोच्च उपलब्ध शुल्कावर गहाण ठेवणे.

१८) प्रादेशिक संचालनालय, राष्ट्रीय सहकार विकास निगम NCDC, पुणे यांना सूचित करण्यात येत आहे की त्यांनी राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) कर्जाची संपुर्णत: परतफेड होईपर्यंत सहकारी साखर कारखान्यांच्या कामकाजाची आणि आर्थिक स्थितीचे निरीक्षण करण्यासाठी कारखान्यास त्रैमासिक भेट द्यावी आणि मागील तीन वर्षाच्या आर्थिक विवरणपत्रकांच्या सर्व मूळ प्रतींचे परिशिष्टांसह रीतसर वैधानिक लैखापरिक्षण केले जात आहे याचीही खात्री करावी. साखर कारखान्याच्या व्यवस्थापन नियुक्त सनदी लेखापालाने/वैधानिक लेखापरिक्षकाने प्रमाणित केलेल्या आर्थिक लेख्यांच्या प्रती प्रादेशिक संचालनालयाच्या कार्यालयात सुरक्षितरित्या जतन कराव्यात.

१९) राज्य शासनाकडून ज्या उद्देशासाठी कर्ज सहाय्य मंजूर केले गेले आहे त्या हेतूने त्याचा वापर न केल्यास, कर्ज रक्कम रोखण्याचा आणि वसूल करण्याचा अधिकार राष्ट्रीय सहकार विकास निगमला (NCDC) असेल.

२०) राष्ट्रीय सहकार विकास निगम (NCDC) साखर कारखान्यांच्या कामकाजाची आणि आर्थिक स्थितीची तपासणी/पुनरावलोकन करण्यासाठी तिच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार असेल आणि/किंवा ते इतर कोणत्याही एजन्सीमार्फत करवून घेण्याचा अधिकार असेल, ज्याचा संपूर्ण खर्च संबंधित कारखान्यांनी करणे आवश्यक राहील.

२१) संबंधित सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाकडून या योजनेंतर्गत प्राप्त होणा-या कर्जाची व्याजासह विहीत मुदतीमध्ये परतफेड करण्याकरीता वैयक्तिक व सामुहिक हमी घेण्यात यावी. संबंधित साखर कारखान्यांच्या संचालकांची वैयक्तिक व सामुहिक जबाबदारीबाबतचे हमीपत्र आणि तसा संचालक मंडळाचा ठराव सादर करणे अनिवार्य असेल.

२२) कारखान्याचे हमीपत्र, कारखान्याच्या अधिकृत सॉलीसिटर यांचेकडून तपशिल प्राप्त झालेल्या अचल मालमत्तेचे गहाणखत करुन कारखान्याच्या जमिनीच्या सातबारा उता-यावर सदरील कर्जाच्या बोजाची नोंद घेण्यात यावी.

२३) कर्जासंदर्भातील कोणत्याही अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यास कर्ज मंजुरी रद्द करण्याचा आणि कर्जाची संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करण्याचा अधिकार राष्ट्रीय सहकार विकास निगमला असेल.

३. **कर्ज परतफेडीबाबत अवलंबावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.**

- सदर योजनेअंतर्गत अदा करण्यात आलेल्या कर्जाची व्याजासह (अनुज्ञेय असल्यास दंडव्याजासह) विहीत मुदतीमध्ये परतफेड करण्याकरीता साखर कारखान्याकडून प्रति क्विंटल साखर विक्रीवर टॅगींगव्दारे तसेच प्राथमिक आणि दुय्यम उपपदार्थांच्या विक्रीमधून आवश्यकतेप्रमाणे कपात करून शासकीय कोषागारात भरणा करावयाच्या रकमांचा दरमहा भरणा करण्याकरीता संबंधीत सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक आणि संबंधीत प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचे संयुक्त बचत बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेमध्ये उघडण्यात यावे. कर्ज वितरणानंतर १ महिन्याचे आत सदरचे संयुक्त बचत खाते उघण्यात यावे.
- सदर संयुक्त बचत बँक खात्यामध्ये, साखर कारखान्याने साखर विक्रीच्या प्रत्येक व्यवहारामधून प्रति क्विंटल साखर विक्रीवर टॅगींगव्दारे कपात करावयाच्या रकमांचा भरणा करावा.
- या खात्यामध्ये जमा झालेल्या रकमेमधून आर्थिक वर्षामध्ये व्याज / दंडव्याजासह (अनुज्ञेय असल्यास) अदा करावयाच्या कर्जाच्या मुद्दल रकमेइतकी रक्कम जमा न झाल्यास सदर संयुक्त बचत बँक खात्यामध्ये साखर कारखान्यांकडून विक्री करण्यात आलेल्या इथेनॉल, सहविजनिर्मीती प्रकल्पातील वीज, बगॅस, मोलॅसिस, प्रेसमड आणि इतर तत्सम बाबींचे विक्रीमधून प्राप्त झालेली रक्कम प्राधान्याने त्या त्या आर्थिक वर्षामध्ये अदा करावयाच्या रकमेइतकी भरणा करावी.
- सदर संयुक्त बचत बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेल्या रकमेचा वापर, फक्त या योजनेअंतर्गत परतफेड करावयाचे कर्ज मुद्दल, कर्जावरील व्याज आणि दंडव्याज (अनुज्ञेय असल्यास) परतफेड करण्याच्या प्रयोजनाशिवाय इतर कोणत्याही प्रयोजनाकरीता करता येणार नाही.
- आर्थिक वर्षामध्ये सदर योजनेअंतर्गत परतफेड करावयाच्या मुद्दल, व्याज आणि दंडव्याज (अनुज्ञेय असल्यास) रकमांचे आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी निर्धारण करून त्याप्रमाणे संयुक्त बचत बँक खात्यामध्ये परतफेडीकरीता रकमा जमा करण्याची संपूर्ण जबाबदारी ही संबंधीत साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची राहील.
- साखर आयुक्तालयाने निर्धारीत केलेल्या विहीत नमुन्यामध्ये दर महिन्याच्या ०५ तारखेस मागील महिना अखेर प्रतिक्विंटल साखर विक्रीवर टॅगींगव्दारे आणि आवश्यकतेप्रमाणे प्राथमिक व दुय्यम उपपदार्थाच्या विक्रीमधून संयुक्त बचत बँक खात्यामध्ये जमा करण्यात आलेल्या रकमांचा तपशील, शासकीय कोषागारामध्ये चलनाव्दारे भरणा करण्यात आलेल्या रकमांचा तपशील, उपलब्ध साखर साठयाचा तपशील, विक्री केलेल्या साखरेचा तपशील, विक्री केलेल्या व शिल्लक असणाऱ्या प्राथमिक आणि दुय्यम उपपदार्थांच्या साठयाचा तपशील आणि सदर योजनेअंतर्गत संबंधीत सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर बंधनकारक असलेल्या अटी व शर्तींचे पालन झालेले आहे किंवा नाही इत्यादीबाबतचा तपशील संबंधीत सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक आणि प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचे संयुक्त स्वाक्षरीने सदर योजनेअंतर्गत अदा करण्यात आलेल्या संपूर्ण रकमांची परतफेड होईपर्यंत साखर आयुक्तालयास सादर करणे अनिवार्य राहील.
- कर्ज विनीयोगाबाबत कारखान्याच्या कार्यकारी संचालक यांनी दरमहा त्याबाबतचा अहवाल सविस्तर तपशीलासह प्रादेशीक सहसंचालक (साखर) यांना सादर करावा.

प्रादेशीक सहसंचालक (साखर), यांनी त्याची पडताळणी करुन त्याबाबतचा दरमहा अहवाल साखर आयुक्तालयास सादर करावा.

- साखर कारखान्याचे संबंधीत वैधानिक लेखापरीक्षक यांनी सदर कर्ज रकमेचा विनियोग दाखला सादर करणे, तसेच सदर कर्ज रकमेच्या परतफेडीबाबतचा तपशील सविस्तरपणे त्यांचे लेखापरीक्षण अहवालामध्ये नोंदविणे आवश्यक आहे.

४. कारखान्याच्या मालमत्तेचे विवरणपत्र संबंधित कारखान्यांनी सादर करावेत. जर वसुली झाली नाही तर कारखान्यांच्या मालमत्तेतून देखील कर्जाची वसुली करण्यात येईल, याचा समावेश त्रिपक्षीय करारात करण्यात यावा.

५. सदर कर्ज रु.२६१.८० कोटी (रुपये दोनशे एकसष्ठ कोटी ऐंशी लक्ष फक्त ) इतक्या रक्कमेची परतफेड करण्यासाठीचा कालावधी ८ वर्षे राहील, सुरुवातीचे २ वर्षे विलंबावधी (Moratorium period) असेल. विलंबावधीमध्ये (Moratorium period) व्याजाचा भरणा करणे अनिवार्य असून तदनंतर मुद्दल व व्याजासह ६ समान वार्षिक हप्त्यात ( सन २०२८-२९ ते २०३३-३४ ) कर्जाची परतफेड करावी. तसेच सन २०२६-२७ च्या गाळप हंगामापासून जे उत्पन्न मिळेल त्यातून प्राथम्याने कर्जाचा वार्षिक हप्ता (मुद्दल+व्याज) वसूल करण्याबाबत आयुक्त, साखर यांनी खात्रीशीर वसूलीसाठी निश्चित अशी व्यवस्था करावी.

६. कारखान्याकडून उत्पादन / विक्री होणाऱ्या साखरेतून मिळणारी व धनाकर्ष, RTGS, NEFT, इत्यादी स्वरुपात प्राप्त होणारी रक्कम साखर कारखाना साखर मालतारण कर्ज असणाऱ्या ज्या बँकेत भरणा करेल त्या संबंधीत बँके समवेत साखर कारखाना व साखर आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले प्रतिनिधी यांचेमध्ये कारखान्याने उत्पादीत व विक्री केलेल्या साखरेच्या तसेच ऊसाचा रस किंवा सिरप यांची थेट विक्री केल्यामुळे येणाऱ्या रकमेतून रु. २५०/- प्रति क्विंटल किंवा साखर आयुक्तालयाने प्रस्तावित केलेल्या त्यापेक्षा जास्तीच्या दराने टॅगींगद्वारे वसुल केलेली रक्कम कारखान्याचे कार्यकारी संचालक आणि प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचे संयुक्त बचत बँक खात्यामध्ये जमा करणेबाबत त्रिपक्षीय (Triparty Agreement) करार करण्यात यावा.

७. सदर निधी **मागणी क्रमांक व्ही (V), ६४२५ - सहकारासाठी कर्जे, (१०८) इतर सहकारी संस्थांना कर्जे, (०३) सहकारी साखर कारखाने, (०३)(११) सहकारी साखर कारखान्यांना खेळत्या भांडवलासाठी सिमांत रक्कम म्हणून कर्ज (रा.स.वि.नि.) ५५ कर्जे व आगाऊ रक्कम (६४२५ ०६५४) (कार्यक्रमांतर्गत)** या लेखाशिर्षाखाली अंतिमत: खर्ची टकण्यात यावा.

८. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेला निधी संबंधित सहकारी साखर कारखान्यांना अदा करण्यासाठी प्रस्तुत प्रकरणी लेखाधिकारी, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व साखर आयुक्त, साखर आयुक्तालय, साखर संकुल, पुणे यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुसार लेखाधिकारी, साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांनी रक्कम आहरित करून संबंधितांना अदा करण्याची कार्यवाही त्वरीत करावी.

९. साखर आयुक्त, पुणे यानी राष्ट्रीय सहकार विकास निगम यांचेकडून वेळोवेळी सहकारी साखर कारखान्यांना मंजूर करण्यात आलेल्या मार्जिन मनी लोन सहकारी साखर कारखान्यांकडून परतफेड केलेल्या मुद्दल व व्याजाचा ताळेबंद ठेवण्यासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात यावा व याबाबतचा अहवाल दर महिन्याच्या शेवटी शासनास सादर करावा.

१०. सदर शासन निर्णय मा. मंत्रीमंडळ उपसमितीच्या दि. २३०.०३.२०२५ व दि.२७.०५.२०२५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १५१/२०२६/व्यय-२, दि.२५.०२.२०२६ व अनौपचारिक संदर्भ क्र. २१/२०२६/ऋण व हमी, दि. ०९.०३.२०२६ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आला असून, त्याचा संकेतांक २०२६०३१६१९०४५६६८०२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरी करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANKUSH
PANDURANG
SHINGADE

Digitally signed by ANKUSH PANDURANG SHINGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD,
2.5.4.20=0619305C0A0825664EFA457FFA51C3F2364841C81F
8C437078A333B7111446A2, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=E11F71FCAC231B0F91F430636DE14F6C49B569
D173346155B9208DCD97DD078B, cn=ANKUSH PANDURANG
SHINGADE
Date: 2026.03.16 19:05:47 +05'30'

**( अंकुश शिंगाडे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृह निर्माण) महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) महोदय यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (ग्राम विकास विभाग व पंचायत राज) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
प्रादेशिक सहसंचालक (साखर), कोल्हापूर
कार्यकारी संचालक, श्री. दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना लि. बिद्री (मौनीनगर). ता. कागल, जि. कोल्हापूर
महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा परीक्षा) मुंबई/नागपूर.
निवड नस्ती (कार्यासन ३-स).